वर्ष : १३ ❑ अंक : ९
सौर भाद्रपद, शके १९३६ (ऑगस्ट, २०१४)
वार्षिक वर्गणी : ₹ ३०

पर्यावरणाशी कृतिशील नातं

# गतिमान संतुलन

संपादक : दिलीप कुलकर्णी

**भूमिका**

'निसर्गस्नेही जीवनशैली' आणि 'पर्यावरणस्नेही विकासनीती' ह्यांचा पुरस्कार करणारं, त्या दृष्टीनं विचार आणि कृति-कार्यक्रम पुढे ठेवणारं हे माध्यम आहे. आत्मपरिवर्तनाच्या ह्या प्रयत्नांत आपणही सहभागी व्हा आणि इतरांनाही सहभागी करून घ्या.

## आर्थिक वाढ नावाचा कर्करोग

अनिर्बंध आर्थिक वाढीचा पुरस्कार करणारा एका विकासवाद्याचा लेख आपण गेल्या अंकात वाचला. अशा 'आर्थिक वाढी'लाच 'विकास' असं गोंडस नाव देण्याची लबाडी अर्थशास्त्रानं केली आहे, आणि लोकांना भुलवण्यासाठी लबाड अर्थशास्त्री दशकानुदशकं तोच शब्दप्रयोग वापरत आले आहेत. म्हणजे एका चुकीच्या गोष्टीला 'विकास' म्हणायचं, अन् मग 'विकास हवा' म्हणून त्याच चुकीच्या गोष्टीचं समर्थन करायचं अशी ही लबाडी आहे.

जगातील बहुतांश राष्ट्रांप्रमाणेच भारतानंही 'आर्थिक वाढी'चं प्रचलित प्रतिमानच स्वीकारून गेली ६ दशकं वाटचाल केली आहे. 'अशा आर्थिक वाढीला वरची मर्यादा अशी काही नाहीच' असा एक भ्रम अर्थज्ञांनी निर्माण करून जनमानसात रुजवला-जोपासला आहे. 'सर्वांना अमेरिकी जीवनशैली जगायला मिळेल' अशा थापा मारून लोकांवर त्यांनी एक गारूड केलं आहे. एवढे 'थोथोर' तज्ज्ञ ज्या अर्थी असं सांगताहेत, त्या अर्थी ते खरंच असणार, असं आम जनतेला वाटणं अगदी स्वाभाविक आहे. अनेक विचारवंतांनी अशा अनिर्बंध आर्थिक वाढीची अशक्यता, असंभवता दाखवून दिलेली असूनही, त्यांना 'पर्यावरणवादी' अशी शिवी हासडून मुख्यप्रवाही अर्थज्ञ त्याच भ्रामक ध्येयाचा पाठलाग चालू ठेवत आहेत.

उघडपणे चाललेल्या ह्या लबाडीची परिणती नजीकच्या भविष्यकाळात कशात होणार आहे हे स्पष्टपणे सांगणारा संदीप वासलेकर ह्या दुसऱ्या एका तज्ज्ञाचा लेख 'सकाळ'मध्ये प्रसिद्ध झाला आहे, तो सोबत छापला आहे. भ्रामक ध्येयाच्या पाठलागाची परिणती लवकरच 'विकास की टिकाव'; 'प्रगती की अस्तित्व' अशा कळीच्या प्रश्नांत होईल, हे वासलेकरांनीच सांगितलं हे बरं झालं. सोनारानंच कान टोचलेले बरे असतात. आपल्याकडचे यच्चयावत् विकासवादी हे पश्चिमेकडे वा चीनकडे तोंड करून बसलेले असतात. पूर्वी साम्यवाद्यां-विषयी विनोदानं असं म्हटलं जायचं की, 'रशियात पाऊस पडला की, हे भारतात छत्र्या उघडतात!' असंच काहीसं ह्या विकासवाद्यांचं आहे. एखादी संकल्पना 'पश्चिमेकडची' आहे म्हटलं की, तिचा ते डोळे झाकून स्वीकार करणार. संकल्पना पश्चिमेकडची आहे म्हणून ती नाकारावीच असं नाही; पण, चिकित्सा न करताच ती स्वीकारणं किंवा नाकारणं कदापि योग्य नाही. 'विकास म्हणजे GDPनं मोजली जाणारी आर्थिक वाढ' ही संकल्पना/व्याख्या आपण कधी तपासली का? पश्चिमेकडच्या विकासांध धृतराष्ट्रांनी प्रसृत केलेली ही व्याख्या भारतीय गांधाऱ्यांनी डोळ्यांवर पट्टी बांधून स्वीकारली. तिची वैधता, उचितता, दीर्घकालीन शाश्वतता, नैतिकता हे काहीही न तपासता ती शिरोधार्य मानली!

बाकीचे मुद्दे क्षणभर बाजूला ठेवले (तसं करणं योग्य नसूनही), आणि ह्या अनिर्बंध आर्थिक वाढीचा निसर्गावर काय परिणाम होईल हे उपजत शहाणिवेच्या (कॉमन सेन्स) आधारे पाहिलं, तर शेंबडं पोरही हे सांगेल की, ह्यातून आत ना उद्या निसर्गव्यवस्था धोक्यात येईल. त्या वाढीसाठी संसाधनं वापरून संपल्यानं; हवा-पाणी-जमीन-अन्न सारं काही प्रदूषित झाल्यामुळे; जैव-विविधता प्रचंड घटून; 'एंट्रॉपी' वाढत जाऊन; वा ह्यातून उद्भवणाऱ्या प्रलयसदृश घटनांमुळे हे घडेल. गेली अडीचशे-तीनशे वर्षं 'विकासा'ची, म्हणजेच 'आर्थिक वाढी'ची, म्हणजेच निसर्ग हळूहळू खंगत-संपत जाण्याची प्रक्रिया चालूच आहे. गेल्या शतकाच्या मध्यापर्यंत फक्त युरोपीय देश, अमेरिका आणि रशिया हेच मोठ्या प्रमाणावर निसर्गाची हानी करत होते; आता एकेक करत ऑस्ट्रेलिया, जपान, चीन, भारत, ब्राझील, मेक्सिको, द.आफ्रिका असे देशही विनाशकांच्या फळीत सामील झाले आहेत. आपल्या मनावर युरोप-अमेरिकेच्या विकासाप्रमाणेच जपान-चीनच्या विकासाचीही मोहिनी आहे. पैकी चीनचा विकास हा स्वत:च्या आणि जगाच्या पर्यावरणांचं शोषण आणि नाश करत कसा चालला आहे, हे वासलेकरांनी छान प्रकारे दाखवलं आहे.

अनिर्बंध आर्थिक वाढीची प्रक्रिया, अशा प्रकारे, निश्चितपणे 'विनाशा'चीच आहे. कर्करोग हा ज्याप्रमाणे विविध अवयवांत पसरत जाऊन त्या माणसाला अखेरीस संपवतो, तसंच ह्या आर्थिक वाढीचं होणार आहे. निसर्गाच्या एकेका अंगांना त्याची बाधा होऊन हानीचं प्रमाण उत्तरोत्तर वाढत जाणार आहे. ह्यातून जीवनाचे आधारच जसजसे खच्ची होत जातील, तसतसं माणसाच्या अस्तित्वावरचं प्रश्नचिन्ह अधिकाधिक ठळक होत जाईल.

हे अशुभ भविष्य टाळायचं असेल, तर अजूनही उपाय करता येऊ शकतील. अजून तरी काही बाबींत, सुदैवानं, 'अपरिवर्तनीय बदल' झालेले नाहीत. तोवरच उपाय केले, तर निसर्गातल्या संजीवक शक्ती पुन्हा कार्यरत होतील, नि त्याचं स्वास्थ्य, संतुलन पुन्हा स्थापित करतील.

ह्या उपायांपैकी सर्वांत मोठा, महत्त्वाचा उपाय म्हणजे 'आर्थिक वाढ' ('विकास') नावाच्या कर्करोगाची जिथे जिथे लागण झालेली आहे, तिथून तो कापून काढणं. ही प्रक्रिया आधी वैचारिक असेल. आपल्या मेंदूलाच ह्या वैचारिक कर्करोगाची लागण झालेली आहे. 'वाढीच्या अर्थव्यवस्थे'च्या (growth economy) रोगपेशी नष्ट झाल्या की, 'स्थिरस्थिती अर्थ-व्यवस्थे'च्या (steady state economy) सुदृढ पेशी आपोआप वाढू लागतील. अशी अर्थव्यवस्था निसर्गाच्या मर्यादांचं पालन करणारी असेल. स्थानिक, विकेंद्रित, नवीकरणक्षम संसाधनं आणि ऊर्जांवर आधारित, विघटनक्षम असाच कचरा निर्माण होणारी, चक्रीय स्वरूपाची... अशी ही व्यवस्था असेल. तीत लोकसंख्या, तिचे उपभोग, उत्पादन, प्रक्रिया, वाहतूक असं सारं काही निसर्गाच्या मर्यादेत असेल. निसर्गाच्या रचनेशी, कार्यपद्धतीशी ती संवादी असेल. त्याच्या मर्यादांचा स्वच्छेनं आदर करणारी असेल.

आपण ही शस्त्रक्रिया केली, तरच आपलं अस्तित्व टिकून राहणार आहे. 'विकास की अस्तित्व' म्हणत असताना प्रश्नचिन्ह लागतं ते मानवाच्या अस्तित्वावर : निसर्गाच्या नव्हे. मानव नावाचा कर्करोग संपवून पुन्हा स्वस्थ बनण्याची क्षमता निसर्गात आहे. प्रश्न आहे तो आपल्या अस्तित्वाचा. ग्रामीण भागात 'लबाडाघरचं आवतन (आमंत्रण)' असा एक वाक्प्रचार आहे. राजकारणी आणि विकासवाद्यांचं 'विकासात सहभागी होण्याचं' आवाहन हे अशाच प्रकारचं आहे. क्षणोक्षणी आणि पदोपदी दिसणाऱ्या विनाशालाच विकास मानून स्वत:चा आत्मघात करून घ्यायचा; की, 'सम्यक् विकासा'ची कास धरून शाश्वत अस्तित्वाचं वरदान प्राप्त करून घ्यायचं, हे आपल्यालाच ठरवावं लागणार आहे. खूप लवकर. वेळ निघून गेलेली नाही तोवरच.

## विकास की अस्तित्व

**संदीप वासलेकर**

गेली काही वर्षं जगात एक वेगळं वारं वाहू लागलेलं आहे. हळूहळू सर्व देशांतले महत्त्वाचे पक्ष डावं-उजवं राजकारण सोडून मध्यमवर्गावर आधारित राजकारण करू लागले आहेत. मध्यमवर्गास पोषक असं मध्यममार्गी राजकारण व अर्थनीती आखण्यावरचा भर वाढला आहे. मे २०१४च्या निवडणुकांत मध्यमवर्गी आकांक्षांचं प्राबल्य दिसलं. त्यामध्ये आपल्याला कमीत कमी कटकटींचं जीवन जगता यावं, ही मध्यमवर्गीय आशा होती. त्याचप्रमाणे, आपल्याला खेड्यात शेती-मजुरी करून जातीपातीचं जीवन जगायचं नाही, तर मध्यमवर्गात जायचं आहे, अशा आकांक्षा होत्या. म्हणून उत्तर भारतातल्या ग्रामीण युवकांनी विकास व आर्थिक भरभराटीचा संदेश घेऊन आलेल्या नरेंद्र मोदी ह्यांच्या नेतृत्वाला पाठिंबा दिला.

हे जसं भारतात झालं, तसंच इतर ठिकाणच्या निवडणुकांतही झालं. ज्या ज्या नेत्यांनी सुखी मध्यम वर्ग व उच्च मध्यम वर्ग निर्माण करण्याची हमी दिली, त्यांचा विजय झाला.

येत्या पाच वर्षांत मोदी सरकार त्या विकासाच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी कार्यरत होईल. हेच आपल्याला इतर अनेक देशांत पाहायला मिळेल. पण ५-१० वर्षांनंतर अंतर्गत व आंतरराष्ट्रीय राजकारणाचा नवीन अंक सुरू होईल, तेव्हा 'हा पक्ष विरुद्ध तो पक्ष' हे राजकारण फार महत्त्वाचं राहिलेलं नसेल. धार्मिक व जातीय राजकारणातला तर थाराच नसेल. 'मानवी आकांक्षा विरुद्ध निसर्गाची गरज' असं नवं राजकारण सुरू होईल. त्या राजकारणात एका बाजूला विकास असेल, तर दुसऱ्या बाजूला टिकाव असेल. एका बाजूला प्रगती असेल, तर दुसऱ्या बाजूला अस्तित्व असेल. 'आकांक्षा विरुद्ध समतोल', 'विकास विरुद्ध टिकाव', 'प्रगती विरुद्ध अस्तित्व' असं राजकारण सुरू होईल. तेव्हा अभूतपूर्व वैचारिक गोंधळ होण्याचा धोका आहे. जर संपूर्ण समाजात वैचारिक अराजकता आली, तर गंभीर परिणाम होऊ शकतात.

येत्या पाच वर्षांत रस्ते, बंदरं, धरणं, कारखाने व घरं बांधण्याची मागणी खूप मोठ्या प्रमाणात येईल. गुंतवणूक करण्यासाठी भारतातले उद्योगसमूह व अमेरिकेतले भारतीय मोठ्या प्रमाणात पुढे येतील. नवीन सरकार गुंतवणूक व उद्योगधंद्यांतले अडथळे दूर करेल. सार्वजनिक प्रकल्प पुढे जातील.

हे सर्व झालं, तर विकास व सुबत्तेचं वातावरण पसरेल. पण, त्याच वेळी दुसरी एक प्रक्रिया नकळत सुरू होईल. बांधकामासाठी दगड, लोखंड, सिमेंट, ऊर्जा लागत असल्यामुळे डोंगर, टेकड्या, जंगलं तोडावी लागतील. हवा-पाण्याचं प्रदूषण वाढेल. वृक्षांचं आच्छादन कमी झालं, तर पाऊस अनिश्चित होईल, शेतीवर परिणाम होईल. मुबलक प्रमाणात पाणी मिळणं कठीण होईल. जैविक विविधतेवर परिणाम होऊन निसर्गाचं ऋतुचक्र अनपेक्षितरीत्या बदलेल.

हे सर्व धोके टाळण्यासाठी दूरवरचा विचार करणं आवश्यक आहे. भारताला एक नवीन सैद्धान्तिक चौकट, विविध मंत्रालयांमध्ये सुसूत्रता असणारी नवीन प्रशासकीय पद्धती व संघर्ष मिटवण्याची आधुनिक यंत्रणा ह्या गोष्टींची नितांत आवश्यकता आहे.

आपल्याकडच्या अनेक लोकांना चीनमधल्या प्रगतीचं आकर्षण आहे. सुंदर, प्रचंड रस्ते; मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करणारे कारखाने; शेतांच्या जागी उभी राहिलेली शहरं; खिशात डॉलर खुळखुळवणारे आणि ओठात पाश्चिमात्य संगीत असणारे युवक हे आपल्याला चीनमध्ये दिसतात; परंतु, अनेक गोष्टी दिसत नाहीत. त्यामुळे चिनी नेते आतून कसे घाबरलेले आहेत, हे कळत नाही. गेल्या केवळ २० ते २५ वर्षांत उत्तर चीनमधली सहा हजार तळी व सरोवरं लुप्त झाली. तिथे आता कोरडी जमीन दिसते. पिवळी नदी समुद्रापर्यंत पोचताना वर्षांतले अनेक महिने दिसत नाही. यांगत्सेला मिळणाऱ्या उपनद्यांमध्ये कारखान्यांतून आलेलं रासायनिक विष असतं.

ह्या होणाऱ्या ऱ्हासामुळे चीनला येत्या २०-२५ वर्षांत अन्न-उत्पादनात मोठा तुटवडा होण्याची भीती आहे. प्रचंड मोठं लष्करी सामर्थ्य असूनही राष्ट्रीय अस्मितेची शेखी मिरवणाऱ्या चीनच्या कम्युनिस्ट सरकारनं पिवळ्या नदीचं पुनरुज्जीवन करण्याचे अधिकार युरोपमधल्या तज्ज्ञांना दिले आहेत व आपला राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा बाजा गुपचूप बंद करून बाजूला ठेवून दिला आहे.

अनेक प्रयत्न करून शक्य नाही झालं, तर पाण्याचा पुरवठा वाढवण्यासाठी १५-२० वर्षांनंतर ब्रह्मपुत्रेचं पाणी वळवण्याचा प्रयत्नही चीन करू शकतो. त्यामुळे आशियाच्या व जगाच्या राजकारणावर मोठा परिणाम होऊ शकतो.

देशातली नैसर्गिक संपत्ती कमी पडली, तर आफ्रिका व आशिया खंडांतल्या गरीब देशांना ओरबाडून, तिथल्या नेत्यांना मालामाल करून, तिथली खनिजं आपल्या सुखासाठी वापरायची, हे चीनचं तंत्र. भारत त्याच तंत्राचा पाठपुरावा करेल; की, आपल्या संस्कृतीशी निष्ठा ठेवून अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाला शह देईल, हे १०-१५ वर्षांनंतर कळेल; मात्र, त्याची तयारी आत्ताच करावी लागेल.

आत्तापर्यंत डावे आणि उजवे असे दोघंही विकासाच्या बाजूनं होतं. त्यांचे मार्ग वेगळे असले; प्रशासकीय कार्यक्षमता वेगळी असली, तरीसुद्धा विकास हे त्यांचं एकच ध्येय होतं. भविष्यकाळात विकास अथवा अस्तित्व ह्यापैकी कुठलं तरी एक निवडण्याचा यक्षप्रश्न उभा राहण्याआधीच सैद्धान्तिक, संस्थात्मक व धोरणात्मक अशा सर्व मार्गांनी तयारी करावी लागेल. हा प्रश्न केवळ भारताचाच नव्हे; तर तो साऱ्या जगाचा आहे. भारतानं चीनचं अनुकरण करण्याऐवजी स्वत:चा मार्ग काढला, तर सारं जग आपलं अनुकरण करेल व ह्या मार्गानं भारत विश्वगुरु बनेल!

*('सकाळ', २२ जून २०१४च्या 'सप्तरंग' पुरवणीतील लेखाचं संपादित पुनर्मुद्रण. लेखाचं शीर्षक ग.सं.साठी बदललं आहे.)*

## 'जीत-हार' ते 'जीत-जीत' १२

**दिलीप कुलकर्णी**

नुकतीच नारळी पौर्णिमा झाली. ह्या दिवसाचा संबंध शाकाहाऱ्यांसाठी नारळाशी असतो; तर, मांसाहाऱ्यांचा माशांशी. म्हणूनच ह्या लेखात आपण मासे(मारी) ह्या विषयाशी संबंधित काही खेळांचा विचार करणार आहोत.

'माणसानं मांसाहार करावा की नाही' हा एक सनातन प्रश्न आहे. तो एकाच वेळीं नैतिकतेशी, स्वास्थ्याशी आणि पर्यावरणाशीही जोडलेला आहे. त्यात पुन्हा मासे, अंडी आणि दूध हे पदार्थही त्या चर्चेत येतात. आपण स्वास्थ्य आणि नैतिकता हे मुद्दे बाजूला ठेवून मासेमारी ह्या मुद्द्याचा विचार करणार आहोत.

माशांचं प्रजनन मोठ्या प्रमाणात होतं. त्यामुळे त्या 'उत्पादना'पैकी काही भाग माणसानं खाण्यासाठी वापरला, तर त्यातून पर्यावरणाची हानी होत नाही. म्हणूनच अशा प्रकारची धारणाक्षम मासेमारी माणूस प्राचीन काळापासून करत आला आहे. समुद्राकाठचे लोक खाऱ्या पाण्यातले मासे खातात, तर अंतर्भागातले लोक नदी-तलावांच्या गोड्या पाण्यातले. ह्यांपैकी समुद्रातल्या मासेमारीला कोळीगीतांमुळे विशेष प्रसिद्धी मिळालेली आहे. म्हावरं, होड्या, डोलकर, बंदरं, वेसवची पारू ह्या गोष्टी शाकाहारी मंडळींलाही माहीत झाल्या त्या कोळीगीतांतूनच.

हे कोळी करीत असलेली 'पारंपरिक मासेमारी' हे स्वैच्छिक हारीतून जीत–जीत खेळ साकार करण्याचं एक उत्तम उदाहरण आहे. पहिली गोष्ट म्हणजे ते छोट्या होड्या वापरतात. इंजिनं येईपर्यंत ह्या होड्या हातानं वल्हवत समुद्रात जाण्याची प्रथा होती. ह्या तंत्रज्ञानाचा पर्यावरणावरचा आघात शून्यवत् होता. हे मच्छिमार वापरायचे ती जाळी मोठ्या भोकांची असायची. त्यामुळे पूर्ण वाढ झालेले मोठे मासेच जाळ्यात सापडायचे. लहान माशांना न पकडण्याची स्वैच्छिक हार, ही त्या माशांना मोठं होण्याची संधी द्यायची.

हे मच्छिमार आणखी एक स्वैच्छिक हार स्वीकारायचे : जूनपासून नारळी पौर्णिमेपर्यंत मासेमारी न करण्याची. ह्या काळात मोसमी वाऱ्यांमुळे समुद्र खवळलेला असतो, ही व्यावहारिक अडचण त्यामागे होतीच; पण, महत्त्वाचं कारण म्हणजे तो माशांचा प्रजननकाळ असतो. त्या काळात मासेमारी केली, तर हळूहळू माशांची उत्पत्तीच थांबेल हे लक्षात घेऊन, ते २-२॥ महिने मासेमारी न करण्याचं बंधन पाळायचं. ह्या स्वैच्छिक हारीमुळे मासे वाढू त्यांचीही जीत होते, नि मासे मिळत राहून मच्छिमारांचीही.

पण, निसर्गापुढे अशी शरणागती पत्करली, तर 'विकास' कसा होणार? म्हणून ह्या समुचित मासेमारीचं रूपांतर हळूहळू 'आधुनिक' मासेमारीत होत गेलं. अफाट क्षमतेचे—प्राय: विदेशी—ट्रॉलर मासेमारीसाठी वापरले जाऊ लागले. ह्या प्रकाराच्या मासेमारीत सारेच खेळ 'माणसाची जीत–निसर्गाची हार' ह्या प्रकाराचे असतात. असा पहिला खेळ म्हणजे जाळ्यांची भोकं लहान ठेवणं. त्यामुळे लहान मासेही जाळ्यात अडकतात नि उत्पादन वाढतं. पण, कालान्तरानं माशांचं प्रजननच थांबतं, नि उत्पादन घटतं. आज माशांच्या कित्येक प्रजाती अशा प्रकारे संपुष्टात आल्या आहेत. म्हणजे, हा जीत–हार खेळ अंतिमत: हार–हार असाच होतो.

दुसरा जीत–हार खेळ म्हणजे बटवा-जाळी (पर्स सीन). ही जाळी आजीबाईच्या बटव्यासारखी असतात. ती वर ओढली की, त्यात असलेले सर्व लहानमोठे मासे मरतात. मग, त्यांपैकी जे हवे आहेत (आर्थिक दृष्ट्या फायद्याचे) तेवढेच मासे—उदा. कोळंबी, ट्यूना, इ.—वेचून गोळा करायचे, नि उर्वरित सगळे (९०% !) समुद्रात फेकून द्यायचे. म्हणजेच जी मासळी नको आहे तीही मारायची. हव्या असलेल्या जातीच्या माशांची लहान पिलंही मारायची. किती 'जिंकायचं' ह्याला काही प्रमाण? मग, अशा मासेमारीमुळे दोन-तीन दशकांत माशांच्या प्रजातीच्या प्रजातीच नष्ट झाल्या, ह्यात आश्चर्य ते काय?

ह्या ट्रॉलरांच्या जाळ्यांच्या खाली 'ऑटर बोर्ड' असतात. भारतीय ट्रॉलरांचे ऑटर बोर्ड लाकडाचे, ६० कि.ग्रॅ. वजनाचे असतात. त्यामुळे ते सागरतळावरून ओढले गेले, तरी फारशी हानी होत नाही. परदेशी बोटींचे ऑटर बोर्ड मात्र पोलादी, २ टन वजनाचे असतात. त्यांच्यामुळे समुद्रतळ खरवडला जातो नि तिथल्या वनस्पती, माशांची अंडी, छोटे मासे हे संपूर्णत: नष्ट होतात. निसर्गावर 'संपूर्ण विजय' मिळवण्याची ही खास पाश्चात्त्य (वा चिनी) शैली आहे. साहजिकच त्यातून निसर्गाची—नि म्हणून माणसाचीही—उद्याची पूर्ण हार निश्चित आहे.

अशा मोठ्या बोटींना खोल समुद्रात मासेमारी करणं बंधनकारक आहे. पण, खोल समुद्रात (खोली ५० मीटरहून अधिक) एका चौ.कि.मी.मध्ये केवळ १ टन मासे मिळतात; तर उथळ समुद्रात ११ टन. त्यामुळे ह्या मोठ्या बोटीही उथळ समुद्रातच अनधिकृतपणे मासेमारी करतात. त्यांच्या ह्या जितीत पारंपरिक मच्छिमारांची हार होते : त्यांना मासळी मिळत नाही; त्यांची जाळी तुटतात; मोठ्या बोटींच्या जाळ्यात अडकून ते बुडतात, इत्यादी. ह्यातून आज पारंपरिक मच्छिमार उद्ध्वस्त झाले आहेत, नि मासळीच संपून उद्या ट्रॉलरवालेही उद्ध्वस्त होणार आहेत. हे जात्यात आहेत, तर ते सुपात.

ह्या काळ्या, हार–हार पार्श्वभूमीवर भारतीय परंपरेनं केलेला जीत–जीत विचार विशेषत्वानं उठून दिसतो. कोणत्याही गोष्टीची दीर्घकालीन शाश्वतता टिकवायची असेल, तर स्वैच्छिक हार स्वीकारून माणसानं निसर्गाला जिंकवत राहिलं पाहिजे हा तो विचार आज अधिकत्वानंच महत्त्वाचा बनला आहे.

* * *

मासेमारीचाच विषय चालला आहे, त्यात आणखी एका जीत–जीत खेळाचा उल्लेख करायला हवा : 'मत्स्यगंधा नौका'. पांडुरंगशास्त्री आठवले ह्यांची ही कल्पना. मच्छिमारांच्या होड्या व्यक्तिगत मालकीच्या असतात. दादांनी कल्पना मांडली ती सामूहिक मालकीच्या नौकेची. तिच्यापासून मिळणारं उत्पन्न समाजाचं. समाजोन्नतीसाठी ते वापरायचं. समाजाची हानी करून, वा समाजाकडे दुर्लक्ष करून (हार) व्यक्तीनं मोठं नाही व्हायचं (जीत); तर समाजाचं भलं करून त्यातून स्वत:चंही भलं साधण्याचा जीत–जीत खेळ खेळायचा. दादांच्या प्रेरणेतून आज पश्चिम किनाऱ्या-वरचा मच्छिमार समाज हाच खेळ खेळतोय.

* * *

सागराशी संबंधित आणखी एका खेळाचा उल्लेख इथे केला पाहिजे : कासव-संवर्धन. सागरी कासवं त्यांची अंडी वाळूत घालून समुद्रात निघून जातात. लोक ती अंडी उकरून काढून खातात. (जीत.) पण, ह्यामुळे कासवांची संख्या घटते. (हार.) चिपळूणच्या 'सह्याद्री निसर्ग मित्र' ह्या संस्थेनं ह्याबाबत जनजागृती करून कासव-संरक्षणात ग्रामस्थांना सहभागी करून घेतलं, नि अंडी खाण्याऐवजी आता लोक अंड्यांचं संरक्षण करून पिलं समुद्रात जातील हे पाहतात. माणसानं स्वैच्छिक हार स्वीकारून निसर्गाला जिंकवण्याचा हा खेळ निश्चितच स्तुत्य आहे. ☯

*(क्रमश:)*

---

# देवासचे 'शेततळे अभियान' (पूर्वार्ध)

**मीनाक्षी अरोड़ा आणि सिराज केशर**

*'एकामागून एक नलिकाकूप खोदणं हा जीत–हार खेळ असतो; त्याची परिणती हार–हार खेळातच होते' ह्या नियमाचं उत्तम उदाहरण म्हणजे देवास जिल्हा. ह्या हार–हार खेळातून तिथले शेतकरी जीत–जीत खेळाकडे कसे गेले ह्याचा 'गांधी-मार्ग'मध्ये प्रकाशित झालेला हा वृत्तान्त.*

चामुंडा आणि तुळजा ह्या देवींचं वसतिस्थान असणारं देवास. स्वातंत्र्यापूर्वी हे शहर दोन संस्थानांची राजधानी होतं. १८व्या शतकाच्या अखेरपर्यंत 'देवास थोरली पाती' आणि 'देवास धाकली पाती' ह्या दोन्ही संस्थानांनी देवासला समृद्ध ठेवण्यासाठी आड, विहिरी, तलाव ह्यांची मोठ्या प्रमाणात निर्मिती केली होती. महाराणी यमुना-बाईसाहेबांनी पाण्याचं काम सतत वाढतं ठेवण्यासाठी एक संस्थाही स्थापन केली होती. ही संस्था लोकांना विहिरी, तलाव खोदण्यासाठी मदत देत असे. राजे-महाराजे आणि समाज ह्यांच्या सामूहिक प्रयत्नांमधून तयार झालेले गोडा तलाव, मेंढकी तलाव, मुक्ता सरोवर ह्यांच्याबरोबरच हजारो आड आणि विहिरी हे शहराच्या सुंदर आणि सुयोग्य जल-व्यवस्थापनाची साक्ष पटवतात.

पुढे राज्य बदललं. इंग्रज आले. त्यांनी तलाव आणि पाण्याची व्यवस्था ही इंग्रजी राज्याचा एक भाग बनवली. इथल्या समाजाच्या खच्चीकरणासाठी समाजाची सत्कर्मं संपवण्याचा प्रयत्न इंग्रजांनी हरतऱ्हनं केला. त्याचा परिणाम भयावह झाला.

गेल्या तीस वर्षांत तर इथल्या सर्व लहानमोठ्या तलावांमध्ये भर घालून, त्यावर घरं आणि कारखाने बांधले गेले. पण, त्यांना पाणी पुरवणारे स्रोतच शिल्लक राहिले नाहीत. मग खूप खर्च करून इंदूरहून नर्मदेचं पाणी रूळगाड्यांनी देवासला येऊ लागलं. आता हा प्रकार बंद होऊन शे-दीडशे किलोमीटरांवरून नळांनी पाणी आणलं जात आहे.

हे झालं शहराच्या बाबतीत. पण, जिल्ह्यातल्या १०६७ गावांना कुठून पाणी मिळणार? शेतीसाठीच्या पाण्याचं काय?

इंग्रजांचं राज्य गेल्यावर आलेल्या इंग्रजाळलेल्यांच्या राज्यात गावांमध्ये नलिकाकूपांचं (विंधन-विहिर) तंत्र पोहोचलं. आधुनिक शेतीसाठी सर्वांत उत्तम पर्याय म्हणून नलिकाकूपांचा प्रचार केला गेला. ६०-७०च्या दशकापासून नलिकाकूप खणणं आणि त्यांतलं पाणी उपसण्यासाठी पंप बसवणं ह्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज आणि अन्य सुविधा पुरवल्या गेल्या. देवास आणि आसपासच्या भागात नलिका-कूप-खणतीचा जणू काही महापूर आला.

आज इथल्या काही गावांमध्ये ५०० ते १००० नलिकाकूप खणलेले आहेत. इस्माईल खेडी नावाच्या गावात जवळजवळ १००० नलिकाकूप खणले गेले. एकेका शेतकऱ्यानं १० ते २५ नलिकाकूप खणले. त्यामुळे त्यांना पाणी मिळालं; १९७५ ते ८५च्या काळात शेतीमध्ये थोडीफार उत्पादनवाढही झाली. पण, १०-२० वर्षांतच जमिनीतलं पाणी खाली जाऊ लागलं. ६०-७० फुटांवर मिळणारं पाणी ३००-४०० फुटांपर्यंत खाली गेलं. महागाई वाढली. २००० सालापर्यंत नलिकाकूप आणखी आणखी खोल खणणं भाग पडल्यामुळे खोदकामाचा खर्चही वाढला. खूप खोल नलिकाकूप खोदून शेतकरी कर्जामध्ये खोल-खोल बुडत गेला. रहाट-गाडग्यानं सिंचन करणारा देवासचा शेतकरी नलिकाकूपांच्या ओझ्याखाली दबून गेला. शेतकऱ्यांमध्ये पलायनवाद वाढीस लागला. पाण्याच्या प्रचंड उपशामुळे नलिकाकूपांमधून येणारी पाण्याची धार बारीक होऊ लागली. ७-७ इंची नलिकाकूपांमधल्या पाण्याची धार १ इंचसुद्धा मोठी येईना. इतक्या बारीक धारेनं शेतीचं सिंचन तर दूरच, पण पिण्यापुरतंही पाणी मिळेना. खूप खोलवरचं पाणी उपसून शेतीला दिल्यानं नलिका-कूपांमधून मोठ्या प्रमाणात खनिजं येऊन शेतं नापीक होऊ लागली. परिणामीं ८०-९०च्या दशकात शेतकऱ्यांनी शेती करणं कमी करून जमिनी विकायला सुरुवात केली.

''कोणावर सूड उगवायचा असेल, तर त्याच्या शेतात नलिकाकूप खणून टाका. त्याची जमीन खराब होईल आणि तो बरबाद होईल!'' हे उद्गार आहेत टोकखुर्द तालुक्यातल्या हरनावदा गावच्या रघुनाथसिंह तोमर ह्यांचे. रघुनाथसिंह ९० एकर शेतीचा मालक आहेत. परंतु, २००३मध्ये त्यांची आर्थिक स्थिती डबघाईला आली होती. सिंचनासाठी वेळेवर आणि पुरेसं पाणी न मिळाल्यामुळे त्यांची शेती तोट्यात गेली होती. पाण्याची कायमस्वरूपी, नीट व्यवस्था लावलीच पाहिजे हे त्यांना जाणवत होतं. तलाव बनवला तर आपली समस्या सुटेल, ह्याविषयी त्यांची खात्री पटली होती. तलाव बनवण्यासाठी त्यांनी आपल्या भावाजवळ मदतीची याचना केली. पण, भावाच्या मतें तलाव बनवणं ही मूर्खपणाची आणि वेळ वाया घालवणारी गोष्ट होती. त्यामुळे त्यानं मदत करायला नकार दिला.

पण, रघुनाथसिंह निराश झाले नाहीत. त्यांनी आपल्या शेतीच्या सिंचनासाठी एका हेक्टरवर दहा फूट खोलीचा तलाव स्वत: तयार केला. १५ बिघे जमिनीचं सिंचन ह्या तलावातल्या पाण्यानं केलं. गेली कित्येक वर्षे प्रतिबिघा १५० कि.ग्रॅ. हरभरे देणाऱ्या जमिनीत त्यावर्षी प्रतिबिघा ३५० कि.ग्रॅ. हरभरे आले. अशा प्रकारे त्यांना १ लाखाचा अतिरिक्त नफा झाला. तलाव बांधायला केवळ ५२ हजार रुपये खर्च आला होता. तलावातून झालेल्या सिंचनानं त्यांना दुप्पट नफा मिळवून दिला! ह्या अर्थशास्त्रानंच त्यांच्या भावासह अनेकांना तलावाचे फायदे समजावून दिले. रघुनाथसिंहांनी आपल्या दृढनिश्चयानं गावापुढे एक आदर्श उदाहरण उभं केलं. ☯

*ई-ग.सं. हवाय?—ई-पत्ता कळवा.*

---

## झाडे लावा—झाडे जगवा

*हा कृतिपूर्ण उपदेश करीत आहेत*

**वा. मो. बर्वे**

पर्यावरण हा विषय सध्याच्या परिस्थितीत जिव्हाळ्याचा व आवश्यक आहे. वाढते प्रदूषण; विषारी बनलेली खाद्य-पेये; घातक रसायनांमुळे शेती-बागायतीवर होणारा प्रतिकूल परिणाम; प्लॅस्टिकचा व ई-कचरा; वीज-पाण्यासारख्या संसाधनांचा गैरवापर; जंगले-देवराया कमी होणे आणि सिमेंटची जंगले वाढणे अशा अनेक बाबींसंबंधात जनजागृती होणे अत्यावश्यक आहे.

ह्यावर उपाय म्हणून आपल्याला सहज शक्य आहे ती कृती करावी अशा विचाराने, मी रोज सकाळी फिरायला जाताना सोबत एक पिशवी घेत असे व तीत निरनिराळ्या वृक्षांच्या बिया घेऊन जात असे. उदा. आंब्याच्या बाठी, जांभळाच्या बिया, चिंचोके, इत्यादि. रस्त्याने जाताना दोन्ही बाजूंना त्या टाकीत असे. त्या बाबत विचार असा की, आपल्याला त्या झाडांची फळे खाता आली नाहीत, तरी पुढे वाटसरूंना सावली व फळे मिळतील. माझ्या ह्या कृतीला पुष्कळ लोक हसले; पण, कालान्तराने झाडे वाढलेली पाहून मला आनंद झाला.

आता 'झाडे लावा–झाडे जगवा' ही सरकारी घोषणा आहे. पण, पूर्वजांनी हेच केले आहे. माझे वडील आंब्याच्या बाठी गोळा करून पहिल्या पावसात रानात जायचे आणि करवंदांच्या जाळीत एकेक बाठ टाकायचे. त्यामुळे भविष्यात तेथे रायवळ आंब्यांची राई तयार झाली व त्याचा आम्हाला उपयोग झाला.

गावात मारुतीचे मंदिर आणि त्याच्याजवळ वड-पिंपळाचा पार असतोच. अनेक गावांत ग्रामदैवताच्या नावाने राखलेली देवरहाट (देवराई) असते. त्यातील झाड तोडायचे नाही असा दंडक असतो. वड-पिंपळासारखे वृक्ष शेकडो वर्षे जगतात. खूप वर्षांपूर्वी एका शेतकी प्राध्यापकांनी व्याख्यानात असे सांगितले की, एक वड व पिंपळ १०हजार वस्तीच्या गावाला प्राणवायू पुरवतो.

काही वर्षांपूर्वी राजापूर तालुक्यातील पांगरी बु. ह्या गावीं जाण्याचा योग आला. तेथील हरिहरेश्वर मंदिरासमोर एक पिंपळाचा पार आहे. तिथे पाटी होती : 'सातशे वर्षांचा पिंपळ'. म्हणजेच हे महावृक्ष-देववृक्ष शेकडों वर्षे जगतात. म्हणूनच ते लावण्याचे-वाढवण्याचे काम आपण केले पाहिजे. ☯

# भारताचं जागतिकीकरण : आघात आणि पर्याय ४

*भारताच्या आर्थिक सुधारणांना १९९१मध्ये प्रारंभ झाला. त्या धोरणाची ३ मुख्य अंगं होती उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण. आता दोन दशकांनंतर आता कोणतं चित्र दिसतं? अर्थव्यवस्था, समाज आणि पर्यावरण ह्यांचं ह्या काळात काय झालं?*

*ह्या साऱ्याचा शोध घेऊन **असीम श्रीवास्तव** आणि **आशिष कोठारी** ह्यांनी 'Churning the Earth : The Making of Global India' हा ग्रंथ लिहिला. त्यातील निवडक माहिती संकलित करून पुण्याच्या 'कल्पवृक्ष' ह्या संस्थेनं 'Globalization in India : Impacts and Alternatives' ही पुस्तिका २०१२मध्ये प्रकाशित केली आहे. तिचा **दिलीप कुलकर्णी** ह्यांनी केलेला हा मराठी अनुवाद.*

### आयातीचं उदारीकरण : भारत ही कचरापेटी

गेल्या दशकभरात भारत हा औद्योगिक राष्ट्रांकडच्या घातक आणि विषारी कचऱ्याचा मोठा आयातक बनला आहे. आपण सध्या १००हून अधिक प्रकारांचा कचरा आयात करतो. त्यांपैकी काही डझन प्रकारांचा कचरा घातक असतो. धातूंच्या भंगाराची आयात आता वर्षाला लक्षावधी टनांची असते. धातूंचे तुकडे आणि पीसीव्हीचा कचरा ह्यांची आयात १९९६-९७ मध्ये ३३ टन होती, ती २००८-०९मध्ये १२,२२४ टनांपर्यंत वाढली. सर्व प्रकारांच्या प्लॅस्टिकच्या कचऱ्यात ५ वर्षांत चौपटीहून अधिक वाढ झाली : २००३-०४मध्ये १,०१,३१२ टन, तर २००८-०९मध्ये ४,६५,९२१ टन. पेप्सिको, हिंदुस्थान लीव्हर ह्यांसारखे मोठे उद्योग हे अनेकदा ह्यातले अपराधी असल्याचं दिसून आलं आहे.

आयातित कचऱ्यामधला वाढता हिस्सा संगणक आणि इलेक्ट्रॉनिक उद्योगांचा आहे. कचऱ्यासंबंधात काम करणाऱ्या 'टॉक्सिक्स लिंक' ह्या अ-शासकीय संस्थेनं केलेल्या चौकशीत असं आढळून आलं आहे की, दिल्लीतल्या पुनर्घटन-कारखान्यांतला सुमारे ७०% ई-कचरा हा औद्योगिक देशांनी भारतात पाठवला होता.

### उपभोगवाद आणि कचरा

भारतात सध्या जी भपकेबाज उपभोगवादाची लाट आली आहे, तिची मुळं मूठभर उच्चभ्रूंच्या विदेशी उत्पादनांच्या हावेत आहेत. १९८०च्या दशकात तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी ह्यांनी आयातीचं उदारीकरण सुरू केलं; पण, उपभोगवादाला सर्वांत मोठा रेटा मिळाला तो आर्थिक 'सुधारणा' सुरू झाल्यावर.

विलासी उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनातील गतिमान वाढीचे पर्यावरणावर सखोल दुष्परिणाम झालेले आहेत. ते साधन-संपत्तीच्या बाबतीत जसे आहेत (उत्खनन, वृक्षतोड, इ.); तसेच उत्पादनाच्या बाबतीतही आहेत (प्रदूषण, कामातले धोके, इ.). 'दि एनर्जी रिसर्च इन्स्टिट्यूट'नं (टेरी) खनिजांसारखे अ-नवीकरणक्षम पदार्थ; ज्यांचा पर्यावरणावर थेट आघात होतो अशा, CFC वायू वापरून तयार झालेल्या फ्रिज वा वातानुकूलकांसारख्या विविध उपभोग्य वस्तू; वाहनं, इत्यादींच्या वापरातील शीघ्र वाढीचा अभ्यास केला आहे. ही वाढ केवळ वाढत्या लोकसंख्येमुळे झालेली नसून, बदलती जीवनशैली ही तिला अधिक कारणीभूत आहे. उदाहरणार्थ, ग्राहक आता सुट्या वस्तू घेण्याऐवजी पॅकबंद वस्तू घेणं पसंत करतात. 'टेरी'च्या अंदाजानुसार आवेष्टनासाठी वापरल्या जाणाऱ्या कागदाचा उपयोग १९९७ मधल्या २.७ कि.ग्रॅ. प्रतिव्यक्तीवरून वाढत जाऊन, २०४७मध्ये तो १३.५ कि.ग्रॅ. प्रतिव्यक्ती इतका होईल. ई-कचरा ही केवळ गेल्या दोन दशकांमधली घटना आहे : त्याचं प्रमाण २००५मध्ये १,४६,१८० टन होतं, ते २०१२मध्ये ८,००,००० टनांपर्यंत वाढण्याची शक्यता होती.

दोन दशकांपूर्वी कल्पनाही केली जाऊ शकत नव्हती, इतक्या प्रकारांनी प्लॅस्टिकनं भारतीयांच्या जीवनात प्रवेश केला आहे. १९९१पासून, विविध प्रकारांच्या प्लॅस्टिकांची देशातील उत्पादनक्षमता १० लाख टनांवरून ५० लाख टनांपेक्षा अधिक झाली आहे. २०००-०१मध्ये भारतात प्रत्येक दिवशी ५,४०० टनांचा प्लॅस्टिकचा कचरा तयार होत होता : वर्षाला सुमारे २० लक्ष टन. (त्यानंतरची आकडेवारी उपलब्ध नाही.)

### उपभोगांमधली विषमता

'ग्रीनपीस इंडिया'नं २००७मध्ये, भारतातल्या वातावरणीय बदलविषयक मुद्द्यांवर एक इतिवृत्त प्रकाशित केलं. त्यातून असं दिसून आलं की, लोकसंख्येचा एक छोटासा हिस्सा प्रचंड प्रमाणावरील कर्बोत्सर्जनाला जबाबदार आहे. कर्बोत्सर्गाची दरडोई सरासरी मात्रा कमी दिसत होती, ती कमी कर्बोत्सर्जन करणाऱ्या मोठ्या लोकसंख्येमुळे. मूठभरांचं प्रचंड कर्बोत्सर्जन त्यामागे लपून राहत होतं. 'ग्रीनपीस इंडिया'ला असं आढळलं की, भारतातले श्रीमंत (प्रतिमाह उत्पन्न रु. ३०,००० वा अधिक) हे गरिबांपेक्षा (प्रतिमाह उत्पन्न रु. ३,००० पेक्षा कमी असणारी निम्म्याहून अधिक लोकसंख्या) ४॥ पट अधिक कर्बोत्सर्जन करतात. प्रतिमास रु. ८,००० पेक्षा अधिक उत्पन्न असणारे १५ कोटी भारतीय हे प्रतिव्यक्ती २॥ टन ह्या मर्यादेच्या केव्हाच पलीकडे गेले आहेत. जागतिक तापमानवाढ २°से.च्या आत राखायची असेल, तर ही मर्यादा अत्यावश्यक आहे, असं शास्त्रज्ञांचं मत आहे. दिवे, पंखे, टीव्ही हे आता प्राय: प्रत्येक घरात असले, तरी त्यांचा अधिक संख्येनं आणि अधिक प्रमाणात वापर होतो तो श्रीमंत घरांमध्ये. काही उपकरणं तर मुख्यत्वे, किंवा केवळ, श्रीमंत घरांतच वापरली जातात : वातानुकूलक, विजेवरचे जलतापक, कपडे धुण्याची यंत्रं, स्वयंपाकघरातील विविध उपकरणं, डीव्हीडीचालक, संगणक, इत्यादी. खनिज तेलांवर चालणाऱ्या वाहनांचा वापर— मोटारगाड्या आणि विमानं—ही तर केवळ श्रीमंतांशीच संबंधित बाब आहे.

कर्बोत्सर्जन हा उपभोगांतील विषमता दर्शवणारा केवळ एक निर्देशक आहे. श्रीमंत वर्ग उपभोगतो त्या सर्व वस्तू, वापरतो त्या सर्व सेवा, आणि फेकून देतो तो सर्व कचरा ह्यांची त्यात बेरीज केली, तर श्रीमंतांच्या जीवनशैलीचा पर्यावरणावरचा आघात हा, गरीब वर्गाच्या आघाताच्या तुलनेनं, खुपेल इतका अप्रमाण दिसू लागतो. ☯

*(क्रमशः)*

---

## कार्य मंगल व्हावं म्हणून...

**अ-मंगल कार्यं**

एका श्रीमंत लग्नाची गोष्ट. भव्य मांडव; आतमध्ये उंची, लाखांच्या आकड्यामध्ये भाडं असणारं कार्यालय, डोळे दिपविणारा थाटमाट. जे काही नजरेला पडतंय ते सारं श्रीमंती थाटाचं. खर्चाचे आकडे मोजायची गरजच नाही.

बफे जेवण, म्हणजे आपणच वाढून घ्यायचं आणि कुठेतरी उभं राहून वा बसून जेवायचं. सुरुवातीला बऱ्याच प्रकारच्या उसळी, आणि काकडी, टोमॅटो, कांदा, बीट, गाजर अशा विविध शेतीमालाच्या खापा. मग चायनीज पदार्थ. त्यात मंचुरिअन, भेळ, न्यूडल्स, वगैरे. मग भारतीय पद्धतीचं जेवण. त्यात पंजाबी पदार्थ, उत्तर भारतीय पदार्थ, महाराष्ट्राचे पदार्थ. पुढे दक्षिणेकडचा डोसा, मसाले डोसा, इडली, उत्तपा, आदि. एका बाजूला मिष्टान्नाचे स्टॉल. तेथे वेगवेगळी मिठाई, रबडी, जिलेबी असं सारं. मग चाट. त्यात भेळ, पाणीपुरी, दहीपुरी, रगडा पॅटीस आणि काही माहीत नसणारे प्रकार. त्याच्या आधी भट्टीत भाजलेल्या आणि तुपात बुडविलेल्या जाड रोट्या व तव्यावर परतलेली भाजी. ही रांग संपता संपता बर्फाचा गोळा, आईस्क्रीम आणि विविध प्रकारची थंड पेयं. पुढे चहा-कॉफी आणि शेवटी पानाचा विडा.

खरोखरीच ह्या पन्नास साठ पदार्थांची गरज असते का, हा पहिला प्रश्न. ह्यातील प्रत्येक पदार्थाची चव आलेला प्रत्येक जण घेतो का, हा दुसरा प्रश्न. घेताना चव घेण्यापुरतंच घेतो की, अधिक घेतो, हा तिसरा प्रश्न. अधिक घेतलेल्यापैकी फक्त चवीपुरतं खातो की, घेतलं आहे म्हणून पूर्ण संपवितो हा पुढचा प्रश्न. प्रत्येक स्टॉलवरून पदार्थ घेतल्यानंतर ताट स्वच्छ केलं जातं की, त्यात बरंचसं उरलेलं असलं तरी त्याच्यासहित ते तेथे ठेवलेल्या कचराकुंडीत टाकलं जातं, हा त्यापुढचा प्रश्न. असे अनेक प्रश्न उपस्थित करता येतील. चिंतन केलं, तर ह्या प्रश्नांमधल्या अर्थाचा घेतलेला अनुभवही आठवेल.

लग्नात जेवतो आहे, दुसऱ्याकडचं आहे, समोर एवढं सगळं दिसतं आहे, मग कशाला काटकसर करा, कशाला हात आखडता घ्या, आपलं काय जातंय–हा विचार सर्वमान्य होऊ लागल्याच्या वेदना खरं तर साऱ्यांनाच व्हायला हव्यात. भरलेल्या ताटातलं तीस टक्के अन्न केवळ फेकलं जात असेल, तर ह्या अन्नावर अधिकार असणाऱ्या, परंतु येथे जास्तीचे अन्न वापरल्यामुळे हा जन्मसिद्ध अधिकार डावलल्या जाणाऱ्यांचे शाप हे तेथे अन्नाची नासाडी करणाऱ्या साऱ्यांना भोवल्याशिवाय कसे राहतील? कशाला हवेत चाळीस-पन्नास-साठ पदार्थ? घरी ठेचा-भाकरी आनंदानं खाणारा माणूस, आवडलं नाही तर फेकण्याचा माजोरीपणा करतो, हा त्या अन्नाचा अवमान नाही तर दुसरं काय? मी फेकलेल्या अन्नात अजून दोन लोक जेवू शकणार असतील, तर त्या लोकांच्या पोटातील खवळलेल्या अग्नीशी मी प्रतारणा करतोय, त्या अग्नीला मी हिणवतोय एवढं तारतम्य बाळगायचं मी कदापि विसरायला नको. आणि तसं जर मला वारंवार विसरायला होत असेल, तर कदाचित उद्या माझ्यावर उपाशी राहण्याची वेळ येणारच नाही हे मी कसं सांगू शकेन?

अन्न हे पूर्णब्रह्म मानलं गेलं आहे. अन्नाच्या उत्पादनासाठी घ्यावी लागणारी मेहनत सर्वांना ठाऊक आहे. त्यासाठी होणारा खर्चही तुम्ही-आम्ही जाणतो. आणि तरीही हजारो-लाखो रुपयांचं अन्न वाया घालवतो. मंगल कार्यालयाच्या बाहेर फेकल्या जाणाऱ्या पत्रावळींवरील शिताभातावर एकाच वेळी तुटून पडणारे भिकारी आणि कुत्री-डुकरं ह्यांची वर्गवारी जेव्हा एकच दिसू लागते, तेव्हा माणूस त्याचं माणूसपण एवढ्या हीनत्वापर्यंत कसं काय येऊ देतो ह्याविषयी आश्चर्य वाटू लागतं.

बरं, ही नासाडी केवळ अन्नाचीच नाही, तर अनेक बाबतींत होते. येतंय पाणी, म्हणून आदल्याच दिवशी भरलेलं शेकडो लिटर पाणी खुशाल मोरीत ओतून द्यायचं; संडासमध्ये पाण्याची नळी तासन् तास सोडायची; सार्वजनिक नळाच्या तोट्या चोरीला गेल्यामुळे दिवस-दिवसभर सुरू असणाऱ्या नळांकडे त्याच नळावर पाणी भरणाऱ्यांनीही दुर्लक्ष करायचं; गटार, अंगणं, पायऱ्या, रस्ते ह्या सगळ्यांना यथेच्छ न्हाऊ घालायचं, ही गोष्ट संवेदनशीलता हरविल्याचं लक्षण नाही तर दुसरं काय? लग्नकार्यात पाण्याच्या प्लॅस्टिकच्या पिशवीतील एक घोट पाणी पिऊन ती पिशवी खाली भिरकवायची; पाण्याचे ग्लास घोटभर पाणी पिऊन खाली ओतायचे; बाटल्या असतील तर अर्धवट पिऊन त्या भिरकवायच्या, ह्या साऱ्याचा विचार आपण करणार आहोत की नाही?

उत्तम प्रतीचे ढीगभर कपडे असले, तरीही नव्यानं सहा-सहा, बारा-बारा ड्रेस खरेदी करायचे. प्रत्येक ड्रेसवर साजेशा चप्पल वा बूट घ्यायचे. चार-दोनदा वापरून ते कचराकुंडीत फेकायचे, ही उधळपट्टीची मस्ती केव्हा थांबणार? एकीकडे काहीच नाही आणि एकीकडे खूप जास्त आहे, हे सारं विषम चित्र आपल्याला खरं तर पाझर फोडणारं आहे. पण, तो पाझर फुटत नाही आणि नको ते चित्र सातत्यानं समोर येत राहतं. मुख्य म्हणजे त्या चित्रातला एक भाग आपण असतो.

आहे म्हणून कसंही वागण्याचा परवाना नैतिक दृष्ट्या आपल्याला मिळालेला नाही. स्वत:सोबत दुसऱ्याचा विचार करण्याची सत्प्रवृत्ती जीवनाच्या प्रवासामध्ये गरजेची आहे. आपण करतो ते योग्य की अयोग्य हे प्रत्येकालाच ठरविता येणं शक्य आहे. पण, हे ठरविणंही आपल्याला गरजेचं वाटेनासं झालं आहे.

वाया जाणारी साधनसामग्री कोणा गरजूच्या गरजा भागविणार असेल, तर खरोखरीच काळजीपूर्वक ती त्या गरजूपर्यंत पोहचविण्यास साऱ्यांनी हातभार लावावयास हवा. हा हातभार लावणं ज्या दिवशी सुरू होईल, त्या दिवसापासून वंचितांचे अश्रू आपोआपच पुसले जातील. नाहीतर मंगल म्हणून योजलेलं कार्य अमंगल होण्यास आपणच हातभार लावल्यासारखं होईल, नाही का?

*(मालेगावच्या 'आपला दवाखाना'च्या मे '१४च्या मासिक अहवालात प्रकाशित झालेल्या लेखाचं साभार पुनर्मुद्रण. लेखकाचं नाव अज्ञात.)*

---

## प्रयत्न साध्या समारंभांचे

**जयंत नेने, पुणे**

मंगलकार्यांच्या आमंत्रणपत्रिकेत 'कृपया आहेर आणि पुष्पगुच्छ आणू नयेत' ही सूचना आता अगदी सर्वसाधारण झाली आहे. पण, १९६४ साली माझ्या बहिणीच्या लग्नात भेटी न स्वीकारण्याचा माझ्या आई-वडिलांचा निर्णय धक्कादायकच होता. तेव्हा; आणि पुढे १९७३मध्ये माझा भाऊ आणि मी पाठोपाठ विवाहबद्ध झालो तेव्हाही, आहेर न घेणे अप्रचलित होते. त्यामुळे आम्हा भावंडांच्या विवाहांत आमच्या बाजूने भेटी घेणे, आणि वधूपक्षाने मात्र रीतसर यादीत नोंद करून आहेर स्वीकारणे, असे विरोधाभासी चित्र होते. मात्र ह्या तिन्ही विवाहांत जेवणावळी, विधी, इत्यादी होतेच.

पुढे उद्योग-व्यवसायात आल्यावर धंद्याचा भाग म्हणून मी विवाहप्रसंगास उपस्थित राहत असे. एका समारंभात असे झाले की, नवरदेव माझा पुरवठादार आणि तो बोहोल्यावर. निमंत्रितांत माझ्या ओळखीचे कुणीच नाही. दुसऱ्या समारंभात मी आमंत्रणात छापलेल्या वेळेवर पोचलो, तर वधू-वर तास-दीड तास उशीराने आले. ह्या अनुभवांनी वैतागून मी सरसकट 'कुठल्याच विवाहाला जायचे नाही' असा निर्णय घेतला आणि व्यावसायिक संबंधांच्या बाबतीत तो काटेकोरपणे पाळलाही.

एकंदरीत माझे मत असे आहे की, विवाह हा अत्यंत वैयक्तिक आणि खासगी प्रसंग आहे; तेथे गर्दी करण्याचे कारणच काय? बरे, अशा प्रसंगी जुन्या मित्रमंडळीला आणि नातेवाईकांना भेटायची संधी मिळते म्हणून गेलो, तर कार्यालयात इतका गलका असतो की, घसा खरवडून ओरडल्याशिवाय संभाषण शक्यच होत नाही. अक्षतांसाठी तांदूळ वाया घालवणे मला पटत नाही, आणि बफे पद्धतीने एका हातात बशी सांभाळत उभ्याने जेवणे आवडत नाही; त्यामुळे 'नको ते जाणे' ही माझी वृत्ती.

माझ्या मुलीचा विवाह मात्र आम्ही अप्रचलित पद्धतीने केला. आमंत्रण-पत्रिका छापल्या नाहीत. बोलवणी ईमेल/एसेमेस आणि फोनवर केली : ती सुद्धा केवळ जवळचे नातेवाईक आणि जिवलग मित्रमैत्रिणींना. व्यावसायिक संबंधांतील कुणासच आमंत्रित केले नाही. कुठलाही धार्मिक विधी केला नाही. केवळ व्यासपीठावर वधू-वरांनी एकमेकांस हार घातले. नंतर मी वधूपक्षातील ज्येष्ठ नातेवाईकांची ओळख करून दिली आणि व्याह्यांनी वराकडील ज्येष्ठ मंडळींची. बस्स! नंतर जेवणाची पंगत : व्यवस्थित खुर्च्या-मेज मांडून.

नुकताच माझ्या चुलत बहिणीच्या मुलीचा विवाह झाला. पुण्यात, भर मे महिन्यात, दुपारी बाराच्या सुमाराचा मुहूर्त. आम्ही दोघे सकाळी आठ वाजताच कार्यालयी गेलो. अगदी तुरळक मंडळी होती. सुरवातीचे विधी आटपून बहीण व तिचे पती, मुलगी, मुलगा, सून आम्हाला निवांत भेटले. कलकलाट नव्हता. आम्ही एकत्र न्याहरी घेतली आणि 'मुहूर्तास उपस्थित राहू शकत नसल्याचे' सांगून साडेनवाला बाहेर पडलो देखील.

आता आमचा ठाम निर्णय आहे की, मंगल कार्य पुण्यात जवळपास असेल, तरच जायचे. भोजनासाठी थांबायचे नाही. आमचे स्नेही आणि नातेवाईक आम्हांस समजून घेतील अशी आशा आहे. ☯


***वर्गणी मनिऑर्डरने पाठवताना...***

❑ प्रत्येक वर्गणीदाराच्या नावाची ३०रु.ची स्वतंत्र म.ऑ. करावी, जेणेकरून त्यांचा नाव-पत्ता आम्हाला त्याच वेळी कळेल.
❑ जुन्या वर्गणीदारांनी नावानंतर कंसात आपला पावती क्रमांक लिहावा.

*इंग्रजी नियतकालिकांतील पर्यावरणविषयक लेखांचा सटीक परिचय*

## हिरवं वाचन

**अजित बर्जे**

आज सृष्टीला भेडसावणाऱ्या असंख्य समस्यांचे मूळ जसे मानवाची अमर्याद वाढणारी हाव हे आहे, तशीच बेसुमार वाढणारी लोकसंख्याही. ह्या लोकसंख्येच्या अन्नाचे काय? आजच्या वाढीच्या वेगानुसार २०५० साली जगाची लोकसंख्या नऊ अब्जांच्या पुढे जाणार आहे. ह्या ३५% वाढणाऱ्या लोकसंख्येला आजच्या पेक्षा दुप्पट अन्नाची गरज भासणार आहे. पृथ्वीवरील एकूण भूभागापैकी हिमाच्छादित भूभाग सोडल्यास, जवळजवळ ४०% जमिनीवर मानव शेती वा शेती-आधारित उद्योग करीत आहे. एवढे असूनही जगभरातील ८७ कोटी लोकांना आजही दोन वेळचे अन्न मिळत नाही वा ते कुपोषित आहेत.

हे व असे अनेक चक्रावून टाकणारे आकडे जागतिक स्तरावर नावाजलेल्या 'नॅशनल जिओग्राफिक' ह्या मासिकाच्या मे महिन्याच्या अंकातून पुढे येतात, आणि जगभर अन्नाची काय परिस्थिती आहे ह्याचा अंदाज येतो. मे महिन्यापासून सुरू झालेली 'द फ्यूचर ऑफ फूड' ही लेखमाला पुढील सात महिन्यांत जागतिक स्तरावरच्या अन्नविषयक समस्या, आव्हाने व त्याच्या संभाव्य उपायांची चर्चा करणार आहे.

ह्या सचित्र लेखांतून एक धक्कादायक माहिती मिळते, ती म्हणजे उष्मासंचयी वायूंच्या उत्सर्जनामुळे आज ती जागतिक तापमान-वृद्धीची समस्या उभी ठाकली आहे, त्याचे सर्वांत प्रमुख कारण अन्ननिर्मिती हे आहे. त्याची सबळ कारणेही पुढे दिली आहेत : प्रामुख्याने खते व कीटकनाशकांच्या वापरातून निर्माण होणारा नायट्रस ऑक्साईड; मांसाहार करणाऱ्यांची वाढती लोकसंख्या; त्या गुरांमुळे निर्माण होणारा मिथेन वायू; निम्म्याहून अधिक लोकांचे मुख्य अन्न असलेल्या भात-पिकाच्या उत्पादन पद्धतीमुळे निर्माण होणारा मिथेन; अधिकाधिक अन्ननिर्मितीसाठी नष्ट केली जाणारी जंगले; चराऊ कुरणांसाठी कायमचे लुप्त होणारे गवतीमाळ प्रदेश; ह्यांचा संकलित परिणाम म्हणून झपाट्याने लोप पावत चाललेले जैव वैविध्य; दूषित होणारे जलस्रोत; सुपीक जमिनीची होणारी धूप व कालांतराने होणारे वाळवंटीकरण; आर्थिकदृष्ट्या संपन्न होणाऱ्या देशांमध्ये—ज्यामध्ये भारत व चीनचाही समावेश होतो—मांसजन्य पदार्थ, अंडी, कोंबड्या, दूधजन्य पदार्थ ह्यांची अफाट वाढलेली मागणी; ह्या जनावरांच्या भरणपोषणासाठी मका व सोयाबीनचे भरमसाठ होऊ लागलेले उत्पादन, इत्यादि. आकडेवारीत बोलायचे झाल्यास जगात निर्माण होणाऱ्या एकूण अन्नाच्या तब्बल ३६% उत्पादन हे केवळ जनावरांचे खाद्य म्हणून वापरले जाते. त्यातून निर्माण होणाऱ्या मांसाहाराच्या तुलनेत, हेच धान्य शाकाहार म्हणून थेट वापरल्यास अन्ननिर्मितीवरील खूप मोठा ताण कमी होऊ शकतो. ह्याबरोबरच जैव-इंधन-निर्मितीसाठी जागतिक स्तरावर जे क्षेत्र लागवडीखाली आहे, ते एकूण शेतीक्षेत्राच्या ९% इतके आहे. आज बर्फाच्छादित जमीन सोडल्यास, पृथ्वीवरील एकूण जमिनीच्या क्षेत्रफळापैकी ३९% जमिनीवर अन्नाचे उत्पादन घेतले जाते. औद्योगिक क्रांतीनंतर जवळजवळ दक्षिण अमेरिकेच्या आकारमानाएवढी जंगले नष्ट करून त्यावर शेती केली जाते आहे; तर, आफ्रिका खंडाएवढी जमीन मांसाहारी लोकांची क्षुधा शांत व्हावी म्हणून गुरे व इतर जनावरे पाळण्यासाठी साफ केली गेली आहे. ह्यापेक्षा अधिक जमीन शेतीखाली आणणे ह्यापुढे शक्य होणार नाही ह्याची जाणीव तज्ज्ञ करून देतात. ह्यापुढे सुयोग्य तंत्रज्ञानाचा वापर करण्याबरोबरच सेंद्रिय पद्धतीच्या आधारे अन्ननिर्मितीत वाढ करणे गरजेचे आहे असे तज्ज्ञ बजावतात. ह्यातून केवळ अन्नधान्याचे उत्पादन वाढेल असे नाही; तर, खते, कीटकनाशके व पाण्याच्या अतिवापरामुळे पर्यावरणाची जी हानी होत आहे त्यालाही काही प्रमाणात आळा बसू शकेल.

मांसाहाराकडून शाकाहाराकडे वळणे ही ह्यापुढे काळाची गरज बनणार आहे. व्यापारी तत्त्वावर उत्पादित केल्या जाणाऱ्या मांसजन्य पदार्थांमध्ये जेव्हा १०० उष्मांकांचे धान्य जनावरांना खाद्य म्हणून दिले जाते, तेव्हा त्यापैकी दुधामध्ये केवळ ४० उष्मांक, अंड्यामध्ये २२, कोंबडीमध्ये १२, डुकरामध्ये १०, तर गायीत केवळ ३ उष्मांक एवढीच ऊर्जा तयार होते. ह्यामुळेच शाकाहार का गरजेचा आहे ते स्पष्ट होते.

सर्वांत सुन्न करणारी आकडेवारी आहे ती अन्नाच्या नासाडीची. जगातील एकूण अन्नोत्पादनापैकी जवळ जवळ निम्मे अन्न कुणाच्याही पोटात न जाता वाया जाते : प्रगत देशांत घरे, उपाहारगृहे, व सुपर मार्केटांमध्ये तयार अन्नाच्या रूपाने; तर, अविकसित देशांत चुकीच्या साठवणूक-, वाहतूक- व वितरण-व्यवस्थेमुळे. त्यामुळे 'गरज ओळखून अन्न शिजवा, मोजकेच पदार्थ करा, भूक असेल तेवढेच ताटात वाढून घ्या, उरलेल्या अन्नाचा पुनर्वापर करा' असे लेखक सांगतो व शेवटी 'सुपर मार्केट व मॉलमध्ये 'शॉपिंग कार्ट'चा आपण किती जागरूकतेने वापर करतो ह्यावर पुढील पिढ्यांची अन्नसुरक्षा अवलंबून आहे' ह्याची जाणीव करून देतो.

भारताच्या दृष्टीने समाधानाची बाब ही आहे की, आज तरी आपण ८९% धान्य थेट अन्न म्हणून उपयोगात आणतो : जे जगात सर्वाधिक आहे.

प्रकाशचित्र-पत्रकारितेचा (photo journalism) उत्कृष्ट नमुना असलेल्या ह्या मासिकातील चित्रंही लिखित माहितीइतकीच अतिशय बोलकी असतात. त्या माध्यमातून दिसणारी परिस्थिती ही पश्चिमेची शेतीतली व्यापारी हाव व तिसऱ्या जगातील मानवांची अगतिकता ह्याचे भयावह चित्र उभे करते!

## वाचकांना लेखन-सहकार्याचं आवाहन

ग.सं.च्या एप्रिलच्या अंकात, ग.सं.चं प्रकाशन दीर्घकाळ सातत्यानं सुरू राहण्याविषयी साशंकता व्यक्त करणारं एक निवेदन प्रसिद्ध केलं होतं. त्यातल्या अडचणी मी वाचकांपुढे ठेवल्या होत्या. हे निवेदन वाचून काही वाचकांची पत्रं आली. त्यांपैकी दोन वाचकांची पत्रं इथे प्रसिद्ध करीत आहोत.

---

□ एप्रिलच्या अंकातील 'महत्त्वाचे निवेदन' वाचले. वैचारिक स्वरूपाची प्रकाशने सातत्याने सुरू ठेवणे अत्यंत कठीण आहे. व्यक्तिशः मी ठाण्याच्या 'श्रीकौपीनेश्वर मंदिर ज्ञानकेंद्र'मार्फत 'ज्ञानकेंद्र-पत्रिका' हे द्वैमासिक १० वर्षे चालवले व आता गुरुपौर्णिमेपासून ते बंद करीत आहे. त्याची व्यावहारिक कारणे बहुतेक आपल्यासारखीच आहेत. ग.सं.च्या प्रकाशनात येणाऱ्या उणीवा/त्रुटी मी मनापासून स्वीकारीत आहे व ह्यापुढेही वर्गणी भरण्याची माझी तयारी आहे.

*—सुहास बाक्रे, ठाणे*

□ ग.सं.मधील निवेदन वाचून वेंगुर्ले-सावंतवाडी परिसरातील माझ्या ओळखीच्या वाचकांचे मला फोन आले. त्यांच्या (खऱ्या) समजुतीनुसार माझे तुमच्याशी असलेले नाते जिव्हाळ्याचे व काहीसे हक्काचे आहे. त्यामुळे त्यांचे म्हणणे तुमच्यापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारीही अर्थातच माझीच आहे.

आमच्या प्रत्येकाच्या आयुष्यात जगण्याचा संघर्ष चालूच आहे. गोरगरिबांसाठी तो मूलभूत गरजांचा असतो; तर आमच्यासाठी तो त्याहूनही मूलभूत असतो : जगण्याचा अर्थ शोधण्याचा. सुखवस्तू जीवन जगत असताना कित्येकदा येणारी उदासीनता, नैराश्य ही ध्येयहीन, अर्थहीन जगण्याचीच निदर्शके आहेत. आमच्या पैकी खूप जण त्याचा अनुभव घेत आलेले आहेत. शालेय जीवनात, वंदनीय असलेल्या शिक्षक-पालकांच्या विचारांचा व अपेक्षांचा थेट परिणाम आमच्या जडण-घडणीवर झाला. त्यांनी दाखवलेली उद्दिष्टे हीच आमची जीवनध्येये बनली. पण, प्रत्यक्षात तेथे पोहोचल्यानंतर भ्रमनिरास झाला. तो फार क्लेशकारक ठरला. अशा वेळीं, उघडपणे चर्चा करायला व्यासपीठच नव्हते. सुखवस्तू जीवन जगणाऱ्या मित्रांना तर त्यात स्वारस्यच नव्हते. शिवाय, आम्हाला आपापसांत मुळापर्यंत चर्चा करून मनातील सल (ऐकणाऱ्याच्या दृष्टीने 'सांगणाऱ्याची कमजोरी') मुळात दाखवायचीच नव्हती.

शिक्षकांकडून आधीच झालेला भ्रमनिरास; पालकांच्या अवास्तव अपेक्षा आणि समाजाचा दांभिकपणा अशा काळोखात आम्ही सर्वच जण कमी-अधिक प्रमाणात आहोत. दृष्टी देणारा, विचार-आचारनिष्ठ मनुष्य अतिदुर्लभ आहे. ह्या परिस्थितीत ग.सं.मार्फत तुमचं दर महिन्याला घरात येणं, हे माझ्यासारख्या कित्येकांना ध्रुवताऱ्यासारखं आहे. जीवनशैलीत बदल होणं; आचार-विचारांची सांगड बसणं, आंतरिक समाधान प्राप्त होणं ह्या सगळ्याला किती वेळ लागेल, हे ज्याच्या त्याच्या प्रकृतीवर अवलंबून आहे. तथापि, आज प्रत्येकाच्या मनात त्या ध्येयाप्रति आदर व निश्चय निर्माण झालेला आहे, ह्याची खात्री मी तुम्हाला देऊ शकतो. तुमच्या मनावर आलेलं मळभ हा थोर निसर्गच दूर करेल. त्या दृष्टीने मी काही सांगणे चुकीचे आहे. मी फक्त ह्या पत्राद्वारे सर्वांच्या वतीने आमच्या मनाची स्थिती तुमच्यापर्यंत पोहोचवू इच्छितो.

*—अजित परब, वेंगुर्ले*

---

ह्या पत्रांप्रमाणेच काहींचे दूरभाष आले; तर, पुण्यातील काहींनी समक्ष भेटही घेतली. 'ग.सं. बंद करू नका; आम्ही विविध कामांत तुम्हाला सहकार्य करायला तयार आहोत' असं सर्वांचं म्हणणं होतं. वाचकांच्या ह्या सकारात्मक प्रतिसादाकरिता धन्यवाद.

वाचकांचे हे सहकार्य गृहीत धरून ग.सं.चं प्रकाशन चालू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, हे सांगण्यास आनंद वाटतो.

तथापि, वाचकांकडून प्रकाशन-कार्यातील सहभागाइतकीच लेखन-सहभागाचीही अपेक्षा आहे. सातत्यानं एकाच विषयावर, एकाच सूत्रातलं लेखन प्रकाशित होत असल्यानं काहीसा तोचतोचपणा येतो. हा विषय आणि हे सूत्र तर बदलता येणार नाही; पण, अनेकांनी लेखन केल्यास त्यात वैविध्य येऊ शकेल. म्हणूनच वाचकांना लेखन-सहभागाचं हे आवाहन.

आपण पुढील प्रकारांनी ग.सं.साठी लेखन करू शकाल : (१) आपण वैचारिक लेखन करू शकत असाल, तर पर्यावरण, विकास, जीवनशैली, स्वास्थ्य, इ. विषयांसंदर्भातलं लेखन. (२) हिंदी/इंग्रजीतले ह्या विषयांवरचे ग्रंथ आपण वाचत असाल, तर त्यांचा विस्तृत परिचय करून देणारं लेखन; किंवा त्यांतील निवडक मुद्द्यांच्या आधारे विश्लेषणात्मक लेखन; किंवा काही अंशाचं भाषांतर. (३) इंग्रजी नियतकालिकांतील लेखांचं भाषांतर. (आपल्याला भाषांतर करणं जमत नसेल, तर मूळ लेख प्रतवून पाठवा : आम्ही भाषांतर करू.) (४) ग.सं.मध्ये प्रकाशित होणाऱ्या विचारांवरची आपली मतं/प्रतिक्रिया. (५) आपण स्वतः वा आपल्या परिचयातील कोणी जीवनशैली अधिकाधिक निसर्गस्नेही बनवण्यासाठी प्रयत्न करत असतील, तर त्यांची माहिती.

वाचकांचं असं लेखन-सहकार्य सातत्यानं मिळत राहून ग.सं.चं प्रकाशन दीर्घकाळ चालू राहू शकेल, अशी आशा आहे.

*—दिलीप कुलकर्णी*

## प्रतिसाद

□ आपण पाठवलेली पुस्तके मिळाली. तशी पत्र लिहिण्याची विशेष गरज नव्हती; पण, आपण करीत असलेल्या अलौकिक कार्यामुळे आपल्याबद्दल खूप आदर आहे, तो व्यक्त करावासा वाटला म्हणून हे पत्र. अहमदाबादेस चुलत भावाकडे गेलो असताना त्यांनी 'गतिमान संतुलना'चा अंक दाखवला. मग त्यांच्याकडचे सर्व अंक वाचून काढले व स्वतःही वर्गणीदार झालो. ७५ वर्षे पुरी केलेली असल्याने मनात येतात त्यातील पुष्कळशा गोष्टी करता येत नाहीत. पण, जमेल तितके वाचन करतो. ग.सं.चे अंक व तुमची पुस्तके योग्य लोकांना दाखवतो व भेट देतो. दुर्दैवाने, अपेक्षित तेवढा प्रतिसाद मिळत नाही; घरातील अनावश्यक दिवे व पंखे बंद करत राहणे, पाण्याचा अपव्यय टाळणे, स्वतःच्या गरजा कमी करत जाणे एवढेच शक्य आहे.

*—डॉ. यशवंत केळकर, इंदौर*

□ २७ एप्रिलला मला नागाव (जि. रायगड) येथील 'ग्राहक मेळाव्या'त बोलण्याची संधी मिळाली. त्यावेळी ग.सं.मधील काही विचार उपस्थितांपुढे मांडले. सुमारे १०० श्रोत्यांना सध्याच्या 'मंगल' कार्याविषयी सांगितले. जीवनशैली का बदलावी तेही सांगितले. 'आईस्क्रीम खाऊ नका' असे गेल्या वर्षीप्रमाणेच आवाहन केले. परंतु, कार्यक्रमानंतर आईस्क्रीमच होते! मी ते खाण्याचे टाळले. ग.सं.चा अंक दर वेळीं वेगळ्या स्नेह्याला देतो आणि वाचून अन्य व्यक्तींना देण्यास सांगतो. वर्गणी भरण्याचीही विनंती करतो. हे विचार समाजात मोठ्या प्रमाणात पसरणे गरजेचे आहे.

*—प्रा. श्याम जोगळेकर, अलिबाग*

(सर्वच वाचकांनी ग.सं.चा आणि त्यातील विचारांचा असा प्रसार करायला हवा. तो आपल्याप्रमाणे कृतिपूर्वक असेल, तर दुधात साखर. —दि.कु.)

**सौर दिनदर्शिका** — **सौर भाद्रपद, शके १९३६ (ऑगस्ट-सप्टेंबर २०१४)**

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| ३० / 21 | ३१ / 22 सप्टेंबर | | | | | १ / ऑगस्ट 23 |
| २ / 24 | ३ / 25 | ४ / 26 | ५ / 27 | ६ / 28 | ७ / 29 | ८ / 30 |
| ९ / 31 | १० / 1 | ११ / 2 | १२ / 3 | १३ / 4 | १४ / 5 | १५ / 6 |
| १६ / 7 | १७ / 8 | १८ / 9 | १९ / 10 | २० / 11 | २१ / 12 | २२ / 13 |
| २३ / 14 | २४ / 15 | २५ / 16 | २६ / 17 | २७ / 18 | २८ / 19 | २९ / 20 |

### गतिमान संतुलन

❑ फक्त एका वर्षाचीच वर्गणी स्वीकारली जाईल. ❑ वार्षिक वर्गणी टपालखर्चासह आहे. ❑ अंक दरमहा दि.२१ला पोस्टात टाकला जातो. महिनाअखेरपर्यंत तो न मिळाल्यास तशी पोस्टकार्डावरील तक्रार कुडावळ्यास पाठवा. प्रती शिल्लक असल्यास दुसरी प्रत पुढच्या अंकासोबत अवश्य पाठवली जाईल. ❑ जुन्या अंकांच्या प्रती शिल्लक नसतात. ❑ वार्षिक वर्गणी म.ऑ.ने कुडावळ्यास पाठवावी, चेक नकोत. ❑ वर्गणी पुण्यात उज्ज्वल ग्रंथ भांडार, अप्पा बळवंत चौक, येथे रोखीने भरता येते.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक व मालक दिलीप दत्तात्रय कुलकर्णी ह्यांनी स्मिता प्रिंटर्स, १०१९ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापवून घेऊन १ मेघदूत, स्नेहनगर, पुणे ४११०३० येथे प्रकाशित केले.
संपादक : दिलीप दत्तात्रय कुलकर्णी

**पंजीकृत नियतकालिक (Registered Newspaper)**

प्रेषण : स.प.महाविद्यालय, पुणे ४११०३०
डाकघरातून; दरमहा दि.२१ला

टपालाने सवलतीच्या दरात पाठवण्याचा परवाना क्र. : PCW/088/2012-14
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना क्र. : WPP-13

खाली चिकटवलेल्या आपल्या नाव-पत्त्याच्या चिठ्ठीवरचा कालावधी **ऑग.१४** असा नोंदलेला असेल, तर आपली वर्गणी ह्या अंकाबरोबर संपते. कृपया त्वरित नूतनीकरण करा.

पावती क्रमांक | कालावधी पर्यंत

**प्रति**

प्रेषक : गतिमान संतुलन,
कुडावळे ४१५७१२,
ता. दापोली, जि. रत्नागिरी



पंजीकरण क्र. : MAHMAR/2002/12860
घोषणापत्र क्र. : PHM/SR/176/VIII/2002, दि.3/10/2002